लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संमत केलेला ठराव क्र.६०
दि.२५.१.२०१६ अंतिमत: विखंडीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : लामनपा-२०१६/प्र.क्र.२८९/नवि-२४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३० ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. लामनपा-२०१६/११२५/प्र.क्र.२८९/नवि-२४ दि.५.१.२०१७

प्रस्तावना : -

लातूर शहर महानगरपालिकेने सन १९७५ मध्ये लातुर शहराचा विकास आराखडा जाहिर केला होता. सदरच्या विकास आराखडयात सर्वे नं. १३९ मध्ये साईट नं. १११ व ११२ यावर अनुक्रमे कल्चरल सेंटर व चिल्ड्रन पार्क असे आरक्षण होते. शासन अधिसुचना दिनांक १४.१२.१९९९ व १४.१.२००० अन्वये सदरच्या विकास आराखडयातील आरक्षण क्र. १११,११२ व ११२- अ हे क्षेत्र आणि आकार यामध्ये बदल करण्यात आले. त्या बदलाबाबत,मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. १११२/२००० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७.१०.२०१५ रोजी आदेश दिले असतानाही दिनांक २५.०१.२०१६ रोजी लातुर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरोधात ठराव क्र.६० दि.२५.०१.२०१६ मंजूर केला.

२. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या दि. २७.१०.२०१५ च्या निर्णयाच्या विरुध्द लातूर महानगरपालिकेने सर्वोच्च न्यायालयात स्पेशिअल लिव्ह पिटीशन दाखल केले असून,सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयास दि.२८.१०.२०१६ च्या आदेशान्वये स्थगिती दिली असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

३. लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने, पारीत केलेला ठराव क्र. ६० दि. २५.०१.२०१६ हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचा उल्लंघन करणारा असल्याने तसेच महानगरपालिकेस आर्थिकदृष्टया अहीतकारक असल्याने हा ठराव विखंडीत करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५१ (१) नुसार प्रथमत: १ महिन्याच्या कालावधीसाठी शासन निर्णय दि.५.१.२०१७ अन्वये निलंबित करण्यात आलेला आहे.

४. या निलंबित ठरावाच्या संदर्भात कोणतेही अभिवेदन प्राप्त झालेले नसल्याचे आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी दि. १८.७.२०१९ च्या पत्रान्वये शासनास कळविलेले आहे. निलंबित ठरावाच्या अनुषंगाने कोणतेही अभिवेदन प्राप्त झालेले नसल्यामुळे सदर ठराव क्र.६० हा अंतिमत: विखंडीत करणे आवश्यक आहे.

५. महानगरपालिकेची जागा व गाळे भाडेपट्टयाने देणे असल्यास सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग, दि. ३.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये एक लक्ष किंवा त्यापेक्षा जास्तीच्या किंमतीसाठी ई-लिलाव प्रक्रिया अवलंब करणे बंधनकारक आहे. स्थायी समितीला व्यक्ती अथवा

संस्थेला थेट जागा/गाळे भाडयाने देण्याचे अधिकार नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ (ड) अन्वये अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये. सदर प्रकरणातील भाडयाचे दर हे चालू बाजारभावापेक्षा/ प्रचलित दरापेक्षा कमी असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. या कारणास्तव महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा ठराव क्र.६० दि.२५.१.२०१६ हा अंतिमत: विखंडीत करणे आवश्यक आहे.

६. उपरोक्त वस्तुस्थितीनुसार लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संमत केलेला ठराव क्र.६०, दि.२५.१.२०१६ हा ठराव अंतिमत: विखंडीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या वस्तुस्थितीनुसार लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व्हे नं.१३९ मध्ये साईट नं.१११ व ११२ मधील गाळे/गाळयांची मोकळी जागा भाडे तत्त्वावर देण्याबाबतचा लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने केलेला ठराव क्र.६०, दि.२५.१.२०१६ हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरूध्द असल्याने सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५१ (३) नुसार अंतिमत: विखंडित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०८३०१११११०६०४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=22804d8f98c03e9a67ca8eca6a02e7eaab4bcc4a3d59dfce4f1c7189ab74b085, serialNumber=e83c1c73de120837488d76379734db4868992e2b35ba1df8cfea9650fcff780f, cn=Kailas Madhukar Badhan
Date: 2019.08.30 11:22:07 +05'30'

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
२) आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर.
३) नगर सचिव तथा प्राधिकृत अधिकारी, लातूर शहर महानगरपालिका, नांदेड.
४) प्रधान सचिव, (नवि-२), नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहायक
५) निवड नस्ती (नवि-२४).